**FORCE MOTORS LIMITED**
CIN : L34102PN1958PLC011172
**Regd. Office :** Mumbai-Pune Road, Akurdi, Pune - 411 035. INDIA
Phone : (+91) 20 27476381 Direct : (+91) 20 27404771
www.forcemotors.com

FORCE

# मुदत ठेव योजना

**जनता व भागधारकांकडून ठेवी स्विकारण्यासाठी**

फोर्स मोटर्स लिमिटेड त्यांच्या सभासदाद्वारा तसेच लोकांकडून कंपनी कायदा २०१३ (कायदा) यातील तरतुदीनुसार कलम ७३ व ७६ व ज्या कंपनी (ठेवी स्विकृती) अधिनियम २०१४ (अधिनियम) वाचला जातात त्याखालील योजनेनुसार ठेवी मागविणेत येत आहेत.

**योजना 'अ'**

| मुदत | आरंभीची ठेव | मुदतपूर्तीनंतर देय रक्कम |
|---|---|---|
| ३ वर्षे | ₹ २५,०००/– | ₹ ३४,४७१/–* |

* व्याजातून कर वजा करावा लागणार नाही असे गृहीत धरुन हिशोब केला आहे. चालू कायद्याप्रमाणे व्याजातून कर वजा करावयाचा असेल तर कर वजा जाता उरलेले व्याज मूळ ठेवीत जमा करून आलेल्या रकमेवर पुढील वर्षाचे व्याज जमा होईल, या तत्वाने हिशोब केल्याने मुदतपूर्तीनंतरच्या देय रकमेत फरक पडेल.

१) ठेव : किमान ₹ २५,०००/– व त्यापुढील रक्कम ₹ ५,०००/– च्या पटीत स्विकारण्यात येईल.

२) व्याज : द.सा. ११% प्रमाणे वरील योजनेनुसार दर सहा महिन्यांनी मूळ रकमेत जमा करण्यात येईल.

**योजना 'ब'**

| मुदत (वर्ष) | दरसाल द. शे. व्याजाचा दर |
|---|---|
| १ | ९% |
| २ | १०% |
| ३ | ११% |

१) एक व दोन वर्षांच्या ठेवीसाठी किमान ₹ १०,०००/– व त्यापुढील रक्कम ₹ ५,०००/– च्या पटीत स्विकारण्यात येईल.

२) तीन वर्षाच्या ठेवीसाठी किमान ₹ २५,०००/– व त्यापुढील रक्कम ₹ ५,०००/– च्या पटीत स्विकारण्यात येईल.

३) व्याज : दर सहा महिन्यांनी दरवर्षी दि. ३१ मार्च, ३० सप्टेंबर रोजी आणि मुदत संपल्यानंतर देण्यात येईल.

(१) व्याज व मुळ रक्कम हि चेकने /इंटरेस्ट वॉरंटस् त्याच वेळेस एचडीएफसी बँक लिमिटेड, पुणे व त्यांच्या भारतातील सर्व शाखाद्वारे दिले जाईल व प्रदान करण्यात येईल.

(२) मुद्दलाची रक्कम जेथे ठेवी स्विकारण्यात येत आहेत त्या सर्व केंद्रावर सममूल्य रकमेने परत करण्यात येतील.

(३) कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आणि मुदतीच्या ठेव योजनेच्या अर्जाच्या फॉर्ममध्ये दिलेल्या व्यवस्थापकाच्या पत्यावरील कार्यालयात उपलब्ध असलेल्या अर्जाच्या फॉर्ममध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीनुसार ठेवी स्विकारण्यात येतील.

(४) कंपनीने, मुदतीच्या ठेवी मिळविण्यासाठी लेखी मान्यता दिलेल्या व्यक्ती वा अधिकृत दलालामार्फत मुदतीची ठेव आली असेल तर अशा व्यक्ती वा अधिकृत दलालाना प्रचलित दरानुसार कंपनी दलाली देईल.

(५) कंपनी खालील प्रमाणे हक्क राखुन ठेवीत आहे

अ) वरील प्रमाणे नमुद केलेल्या कोणत्याही किंवा सर्व शर्तीमध्ये बदल वा सुधारणा, नोटिसी शिवाय करण्याचे अधिकार.

ब) ठेव रक्कम स्विकारलेल्या दिवसापासुन ६ महिन्यानंतर मुदत संपण्याच्या आधि ठेव रक्कम परत करणे.

क) कोणत्याही व्यक्तींचे कोणतीही ठेव स्विकारणे वा नाकारणे हा हक्क कंपनी राखुन ठेवत आहे. ठेव स्विकारणे हे कंपनीच्या मर्जीवर अवलंबुन असेल. ठेवी ठेवण्याबद्दलचा सुझाव नाकारल्यास त्याचे समर्थन करणे कंपनीवर बंधनकारक राहणार नाही.

(६) ठेव रक्कम ही कंपनीच्या (ठेव स्विकृती) अधिनियम २०१४ च्या नियमाप्रमाणे व कायद्यामध्ये वेळोवेळी झालेल्या बदलाच्या अधिन राहिन.

(७) ठेवी केवळ पुणे न्यायिक अधिकार क्षेत्राचा विषय आहेत.

(८) नियंत्रणापलिकडे असलेल्या कारणांसाठी मुळ रक्कम/ व्याज देण्यास उशिर झाल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही.

(९) कंपनी कायद्यातील कलम ७३ च्या तरतुदीनुसार ज्या नियमाने जाहिराती किंवा परिपत्रातील ठेवी मागणेच्या उद्देशाने दिल्या जातात, त्या कंपनी कायद्यातील कलम ७३ च्या तरतुदीनुसार व त्यासोबत लागु असलेल्या नियमावलींची पुर्ण पुर्तता करतात. त्याची मुळ प्रत या योजनेच्या सोबत जोडलेली आहे.

**कंपनी (ठेव स्विकृती) अधिनियम २०१४ नुसार सदर कंपनी संबधीचा तपशिल स्पष्ट करणारे विधान (स्टेंटमेंट) खालील प्रमाणे आहे.**

**अर्ज डीपीटी – १**

**ठेवी मागविण्यासंदर्भातील परिपत्रक किंवा जाहिरातीच्या स्वरुपातील परिपत्रक :**

[कंपनी (ठेव स्विकृती) अधिनियम २०१४ च्या नियम ४ (१) आणि ४ (२) आणि कलम ७३ (२) (अ) आणि कलम ७६ च्या अनुषंगाने जाहिरातीतील नमुन्याप्रमाणे खालील गोष्टी असतील.]

**१. सर्वसाधारण माहिती :**

**अ. कंपनीचे नाव, पत्ता, संकेतस्थळ आणि संपर्कविषयक इतर तपशील : फोर्स मोटर्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय/ जागतिक मुख्यालयाचा पत्ता:** मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे – ४११ ०३५, महाराष्ट्र,
दुरध्वनी क्रं. (+९१) २० २७४७६३८१–८९ डायरेक्ट (+९१) २० २७४०४७७१
कॉर्पोरेट आयडेंटिटि क्रमांक : L34102PN1958PLC011172 संकेतस्थळ : www.forcemotors.com

**ब. कंपनीच्या स्थापनेची तारीख :** ८ सप्टेंबर १९५८.

**क. कंपनीचा व्यवसाय तसेच कंपनीच्या शाखांबद्दल तपशील –** कंपनी कमर्शियल व्हेईकल्स, ट्रॅक्टर्स, इतर कारणांकरिता डिझेल इंजिन्स आणि त्यांचे सुटे भाग यांचे उत्पादन करते. कंपनीचे आकुर्डी, जि. पुणे (महाराष्ट्र), पिठमपूर, जि. धार (मध्यप्रदेश), उर्से, जि. पुणे, (महाराष्ट्र) तसेच चेन्नई (तामिळनाडू) येथे कारखाने आहेत.
कंपनीच्या उपकंपन्याद्वारे केला जाणारा व्यवसाय – टेम्पो फायनान्स (वेस्ट) प्रायव्हेट लिमिटेड – नॉन बँकिंग फायनान्स कंपनी.

**ड. कंपनीच्या व्यवस्थापनासंबधीचा संक्षिप्त तपशील –** कंपनीचे व्यवस्थापन कंपनीचे अध्यक्ष, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तसेच व्यवसायिक तज्ञ हे संचालक मंडळाच्या नियंत्रण, मार्गदर्शन आणि देखरेखीनुसार करतात.

ई. संचालकांची नावे, पत्ता, डीन व व्यवसाय –

| अ.क्र. | नाव व पत्ता | डीन | व्यवसाय |
|---|---|---|---|
| १ | **श्री. अभयकुमार नवलमल फिरोदिया**<br>'सन्मित्र', १३२ ब / २ अ, गणेशखिंड रोड, पुणे – ४११ ००७. | ०००२५१७९ | उद्योगपती |
| २. | **श्री. प्रसन अभयकुमार फिरोदिया**<br>'सन्मित्र', १३२ ब / २ अ, गणेशखिंड रोड, पुणे – ४११ ००७. | ०००२९६६४ | उद्योगपती |
| ३. | **श्री. सुधिर मेहता**<br>प्लॉट नं. २६, यशवंत नगर को.ऑ. हौसिंग सोसायटी, गणेशखिंड रोड, पुणे – ४११ ००७ | ०००५६८६७ | उद्योगपती |
| ४. | **श्री. प्रताप जी. पवार**<br>सर्वे नं. ७३, ऑफ बाणेर रोड, पॅनकार्ड क्लब रोड जवळ,<br>श्रॉफ सुयश  बिल्डींगच्या मागे, पुणे – ४११ ०४५. | ०००१८९८५ | उद्योगपती |
| ५. | **श्री. एस. पद्मनाभन**<br>३०, विश्रामबाग कॉलनी, सेनापती बापट रोड, पुणे – ४११ ०१६. | ००००१२०७ | मॅनेजमेंट कन्सलटन्ट |
| ६. | **श्री. विनय कोठारी**<br>मित्तल टॉवर्स, 'अ' विंग, १० वा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१. | ००३३७१३४ | उद्योगपती |
| ७. | **श्री. नितीन आर. देसाई**<br>४५७, सिंध हौसिंग सोसायटी, औंध, पुणे – ४११ ००७ | ००१४०२३९ | उद्योगपती |
| ८. | **डॉ. इंदिरा जे. पारेख**<br>४०१, फोनिक्स कमर्शिअल कॉम्प्लेक्स, रेसिडेन्सी क्लब जवळ,<br>बंडगार्डन रोड, पुणे – ४११ ००१ | ००१४३८०१ | मॅनेजमेंट कन्सलटन्ट |
| ९. | **श्री. अरुण शेठ**<br>द्वारा प्रभुदास लिलाधर प्रा. लि. ३ मजला, साधना हाऊस पी.बी.<br>मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०१८. | ०००८६८९१ | गुंतवणूक सल्लागार |
| १०. | **श्री. प्रशांत वि. इनामदार**<br>तेजोमया प्लॉट नं. ७९, सेक्टर २६, निगडी, पुणे – ४११ ०४४ | ०७०७१५०२ | कार्यकारी संचालक |

**फ. जोखमीसंदर्भात व्यवस्थापनाचे अनुमान :**

कंपनी वाहनांचे व ट्रॅक्टरसचे उत्पादन करते. कंपनी उत्पादित करीत असलेल्या प्रवासी व्हॅन्स, जनउपयोगी (युटिलिटी) वाहने व हलकी व्यापारी वाहने यांच्या मागणीत नजीकच्या भविष्यात मागणी स्थिर असण्याची शक्यता आहे.

एक महत्वाचा जोखमीचा मुद्दा म्हणजे या वाहनाची व व्हॅन्स ची बाजारपेठ या गोष्टी सरकारी धोरणावर, तसेच करआकारणी प्रमाण व परवाना मिळण्याच्या सहजतेवर अवलंबून असते.

**जी. डिफॉल्टसंबंधी (दोषपात्रतेसंबंधी) तपशील, समाविष्ट रक्कम, डिफॉल्टचा कालावधी आणि खालील परतफेडीसंदर्भात सद्यस्थिती :**

१) कायदेशीर देणी (स्टॅट्युटरी ड्यूज) – नाही
२) डिबेंचर्स आणि त्यावरील व्याज – नाही
३) कोणत्याही बँकेचे किंवा वित्त संस्थेचे कर्ज आणि त्यावरील व्याज – नाही

**२. ठेव योजनेचा तपशील :**

अ. मंडळाचा ठराव पारित होण्याची तारीख : २६ सप्टेंबर, २०१५.
ब. अशा प्रकारच्या ठेवी मागविण्यासाठी मान्यता देण्याकरिता सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारित करण्याची तारीख : २६ सप्टेंबर, २०१५.
क. ठेवींचे प्रकार अर्थात् सिक्युअर्ड किंवा अनसिक्युअर्ड – अनसिक्युअर्ड
ड. कंपनीद्वारे कायदा आणि अधिनियमानुसार ठेवीच्या माध्यमातून उभी केली जाऊ शकणारी रक्कम आणि मागील लगतच्या आर्थिक वर्षाच्या अंतिम दिवशी आणि परिपत्रक किंवा जाहिरात जारी करण्याच्या तारखेला प्रत्यक्ष धारण केलेल्या एकंदर ठेवी आणि ठेवींद्वारे उभी करावयाची प्रस्तावित रक्कम आणि पुढील बारा महिन्यांमध्ये परतफेड करावयाची ठेव रक्कम :

(रु. लाख मध्ये)

| | | |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या सभासदांकडून उभी केली जाऊ शकणारी ठेव रक्कम. | १३,०३५.६७ |
| २) | जनतेकडून उभी केली जाऊ शकणारी ठेव रक्कम. | ३२,५८९.१७ |
| ३) | जनतेकडुन दि ३१ मार्च २०१५ रोजी कंपनीने स्विकारलेल्या ठेवी | १,७५०.१५ |
| ४) | कंपनीने सदर परिपत्रक जारी केलेल्या तारखेच्या स्विकारलेल्या ठेवी (दि. २६ सप्टेंबर २०१५) | १,४९८.६५ |
| ५) | दि. १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ दरम्यान परतफेड योग्य ठेवी रक्कम | ३,२१२.९५ |
| ६) | सुचवलेल्या उभारु शकणारी एकंदर ठेवी रक्कम. | ३,५०१.३५ |
| ७) | पुढील १२ महिन्यात ठेवीच्या परतफेडीची रक्कम (दि. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६) | १,००६.१० |
| ८) | दि. ३१ मार्च २०१५ रोजी कंपनीने जनतेकडून स्विकारलेल्या ठेवी | १,७५०.१५ |
| ९) | दि. २६ सप्टेंबर २०१५ च्या परिपत्रकाप्रमाणे सभासदांकडून कंपनीने स्विकारलेल्या ठेवी. | ४८४.६५ |
| १०) | दि. २६ सप्टेंबर २०१५ च्या परिपत्रकानुसार जनतेकडून स्विकारलेल्या ठेवी. | १,०१४.०० |

**ई. ठेवीच्या शर्ती, कालावधी, व्याजाचा दर, देणींची पद्धत, परतावा व परतफेड :–**

१) ठेवी ठेवलेल्या तारखेपासुन ३६ महिन्यांपेक्षा जास्त स्विकारले जाणार नाही.

२) व्याजाचा दर

१) योजना 'अ' – व्याज : द.सा. ११% प्रमाणे वरील योजनेनुसार दर सहा महिन्यांनी मूळ रकमेत जमा करण्यात येईल.

२) योजना 'ब'* – व्याज : पहिल्या वर्षी – ९% दुसऱ्या वर्षी – १०% तिसऱ्या वर्षी– ११%

* व्याज दर सहा महिन्यांनी दरवर्षी दि. ३१ मार्च, ३० सप्टेंबर रोजी आणि मुदत संपल्यानंतर देण्यात येईल.

३) ठेवी अकांउटपेयी चेक किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे स्विकारल्या जातील व त्याच पद्धतीने परतावा दिला जाईल.

**एफ. योजनेची सुरु होण्याची तारीख आणि त्याचा कालावधी परिपत्रकाप्रमाणे किंवा जाहिरातीप्रमाणे अधिकृत राहिल. सदर योजना सुरु होण्याची तारिख नमूद करणारे प्रस्तावित वेळापत्रक आणि सदर परिपत्रक किंवा जाहिरातीच्या वैधतेचा कालावधी :** जारी करण्यात आलेली हि जाहीरात दि. ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत किंवा कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत या पैंकी जे अगोदर असेल त्यानुसार वैध असेल.

**जी. ठेवी उभारण्याची कारणे किंवा हेतु –** कंपनीच्या उद्योगासाठी व्यावसायिक कामासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीसाठी

**एच. मिळालेले क्रेडिट रेटिंग क्रेडिट एजन्सीचे नाव मिळालेले रेटिंग, मिळालेल्या रेटिंगचा अर्थ, रेटिंग मिळालेली तारीख :**

१) क्रेडिट रेंटिग एजन्सीचे नाव :– क्रिसील २) मिळालेले रेटिंग :– एफ ए ए / स्टेबल

३) मिळालेल्या रेंटिगचा अर्थ :– स्टेबल ४) रेटिंग मिळालेली तारीख :– २२–०९–२०१५

**आय. ठेवी विमा कंपनीचा हिस्सा –विमा कंपनीने नाव विमा कंपनीच्या शर्ती, विम्याचा संरक्षण हिस्सा, डिफॉल्ट असल्यास दावा करण्याची पद्धत –** लागु नाही

**जे. अशा प्रकारच्या ठेवी सुरक्षित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या किंवा निर्माण करावयच्या आकाराचा (चार्जस) संक्षिप्त तपशील :–** लागु नाही, कारण स्विकारलेल्या ठेवी असुरक्षित आहेत.

**के. संचालकाचे / प्रवर्तकाचे किंवा महत्वाच्या व्यवस्थापकांच्या ठेवी किंवा आर्थिक स्वारस्थ इतर लोकांपेक्षा वेगळे :**

कंपनीत ठेवी ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला वेगळया प्रकारचे व्याज देण्याचे कंपनीने सुचविलेले नाही. जर संचालक/प्रवर्तक किंवा महत्वाच्या व्यक्ती कोणताही ठेवी जमा करत असतील किंवा कोणत्याही व्यक्तीकडून कंपनीत ठेवी ठेवल्या जात असतील तर अस्तितवात असलेल्या योजनेप्रमाणे व्याज दर लागु राहील.

**३. कोणतीही थकबाकी असणाऱ्या ठेवींचा तपशील**

अ. थकबाकी रक्कम – ₹ १,४९८.६५ लाख दि. २६ सप्टेंबर २०१५.

ब. ठेव स्विकृतीची तारीख – दि. २० ऑक्टोबर २०१२ ते दि. २५ जुलै २०१५

क. स्विकारण्यात आलेली एकूण रक्कम – ₹ १,४९८.६५ लाख दि. २६ सप्टेंबर २०१५.

ड. व्याजाचा दर : – पहिल्या वर्षी – ९% – दुसऱ्या वर्षी – १०%– तिसऱ्या वर्षी – ११%

ई. ठेवीदारांची एकूण संख्या – १६६४, दि. २६ सप्टेंबर २०१५ रोजी

फ. ठेवीची परतफेड व व्याज अदा करण्यामधील दोषपात्रता (डिफॉल्ट), त्यामध्ये डिपॉजिटर्सची संख्या, रक्कम आणि दोषपात्रतेचा कालावधी समाविष्ट (असल्यास) : हे पोटकलम लागु नाही कारण कंपनीकडून कोणताही ठेवीच्या परतफेडीमध्ये व व्याज दर रकमेमध्ये दोष नाही

जी. ठेवीदाराच्या ठेवीवर गोळा झालेल्या व्याजाचा हक्क सोडणारे : नाहीत

**४. कंपनीची आर्थिक स्थिती**

अ. कराबाबत तरतुद करण्यापुर्वी किंवा नंतर असलेल्या कंपनीचा नफा, परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेच्या लगतच्या मागील तीन आर्थिक वर्षांसाठी कराची तरतुद केल्यानंतर असलेला

(₹ लाख मध्ये)

| या तारखेला संपलेल्या आर्थिक वर्षांसाठी | अपवादात्मक बाबी आणि करपुर्व नफा | करपुर्व नफा | करपश्चात नफा |
|---|---|---|---|
| दि. ३१ मार्च २०१३ | १,९१३.१७ | १,९१३.१७ | १,४२७.८८ |
| दि. ३१ मार्च २०१४ | ६,२६२.७० | ६,२६२.७० | ७,७६९.४३ |
| दि. ३१ मार्च २०१५ | १२,४९४.३१ | १२,४९४.३१ | १०,१३६.२७ |

ब. वर निर्देशित तीन आर्थिक वर्षासाठी कंपनीने जाहीर केलेला लाभांश

| तपशील | २०१४–१५ | २०१३–१४ | २०१२–१३ |
|---|---|---|---|
| लाभांश : इक्विटी शेअर्सवरील लाभांश | ५०% | ३०% | ३०% |

गेल्या तीन वर्षासाठी इंटरेस्ट कव्हरेज रेशो

| तपशील | २०१४–१५ | २०१३–१४ | २०१२–१३ |
|---|---|---|---|
| करपश्चात रोख नफा<br>+ अदा केलेले व्याज | ३२.४७<br>प्रसंगी | १७.०६<br>प्रसंगी | ११.८३<br>प्रसंगी |

क. परिपत्रक किंवा जाहिरात जारी करण्याच्या तारखेला लगतच्या मागील वर्षातील ३ लेखापरिक्षित ताळेबंदानुसार कंपनीच्या आर्थिक स्थितीचा संक्षिप्त तपशिल:

(₹ लाख मध्ये)

| देणी | ३१/३/२०१५ रोजी | ३१/३/२०१४ रोजी | ३१/३/२०१३ रोजी | मालमत्ता | ३१/३/२०१५ रोजी | ३१/३/२०१४ रोजी | ३१/३/२०१३ रोजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भागभांडवल | १,३१७.९० | १,३१७.९० | १,३१७.९० | प्रलंबित मालमत्ता | ९७,८५०.६२ | ९२,६५६.८५ | ८८,७३०.३७ |
| राखीव व जादा निधी | १३०,३७०.१२ | १२१,२८४.०१ | ११३,९७७.०५ | चालु मालमत्ता | ९९,३१७.६१ | ८४,५३०.६६ | ८२,०५३.०० |
| प्रलंबित देणी | ६,०५१.९२ | ५,१६२.२७ | ९,५५०.८१ | | | | |
| चालु देणी | ५९,४२८.२९ | ४९,४२३.३३ | ४५,९३७.६१ | | | | |
| **एकूण** | **१९७,१६८.२३** | **१७७,१८७.५१** | **१७०,७८३.३७** | | **१९७,१६८.२३** | **१७७,१८७.५१** | **१७०,७८३.३७** |

(₹ लाख मध्ये)

| अ. क्र. | संभाव्य देण्यासंबधीचा संक्षिप्त तपशिल | ३१ मार्च २०१५ | ३१ मार्च २०१४ | ३१ मार्च २०१३ |
|---|---|---|---|---|
| १. | करविषयक बाबीकरीता | ४,६७३.९१ | २,९६६.४६ | २,३९७.५४ |
| २. | भांडवली खाती पार पाडावयाच्या राहिलेल्या कंत्राटाची तरतुद न केलेली अंदाजे रकमेकरिता | ७,६४२.५९ | ७,७९४.०२ | ९,१४४.१४ |
| ३. | इतर कारणाकरिता | ३,२९४.४३ | २,९१९.१९ | २,६०७.२४ |
| | **एकूण** | **१५,६१०.९३** | **१३,६७९.६७** | **१४,१४८.९२** |

ड. परिपत्रक किंवा जाहिरात जारी करण्याच्या तारखेला लगतच्या वर्षासाठीचे लेखापरिक्षित रोखता प्रवाह (ऑडीटेड कॅश फ्लो) स्टेटमेंट :

(₹ लाख मध्ये)

| अ. क्र. | तपशील | ३१ मार्च २०१५ | ३१ मार्च २०१४ | ३१ मार्च २०१३ |
|---|---|---|---|---|
| १. | कामकाजातुन प्राप्त झालेले रोखता प्रवाह | २२,५९६.९८ | ११,५६६.७७ | ८,३२५.६५ |
| २. | गुंतवणुकीतून प्राप्त झालेले रोखता प्रवाह | (९,६२२.५४) | (९,९५६.९६) | (३०,४१०.८१) |
| ३. | आर्थिक कामकाजातून प्राप्त झालेले रोखता प्रवाह | (४,४५६.०८) | (३,०१८.१४) | (१,६१०.३३) |
| | **रोखता आणि रोखता समतुल्यामध्ये झालेली एकूण वाढ/(घट)** | **८,५१८.३६** | **(१,४०८.३३)** | **(२३,६९५.४९)** |

ई. गेल्या तीन वर्षांमध्ये लेखा धोरणामध्ये (अकाउटिंग पॉलिसीमध्ये) झालेले बदल आणि त्याचा कंपनीच्या नफा आणि सेवेवर झालेला परिणाम – कंपनीने मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये लेखा धोरणामध्ये कोणतेही बदल केलेले नाही.

**५. कंपनीच्या संचालकांद्वारे उद्घोषणा**

**(अ)** संबंधित कायदा लागु झाल्याच्या अगोदर अथवा नंतर किंवा व्याज अदा करण्यासंदर्भात, स्विकारण्यात आलेल्या ठेवींची परतफेड करण्यामध्ये कंपनीची कामगिरी उत्तम असून कंपनीवर कोणताही (डिफॉल्ट संबधी) दोषारोप नाही.

**(ब)** कंपनीचे व्यवहार आणि प्रस्तावसंदर्भात संचालक मंडळाने स्वत:ची पुर्णपणे खात्री आणि समाधान करुन घेतले आहे आणि संचालक मंडळाचे असे मत आहे की, कंपनीचे भविष्यातील आर्थिक स्थितीसंदर्भातील अंदाज अत्यंत आशादायक आहेत. कंपनीला असणारी देणी ज्या तारखेला देय असतील तेव्हा ती देण्यासाठी कंपनी पूर्णपणे सक्षम आहे आणि सदर परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधीदरम्यान कंपनी नक्कीच दिवाळखोर बनणार नाही.

**(क)** या संदर्भात करण्यात आलेला कायदा आणि अधिनियमाच्या तरतुदींची कंपनीने पूर्तता केली आहे.

**(ड )** सदर कायदा आणि अधिनियमाच्या तरतुदींची पुर्तता करणे म्हणजे संबंधित ठेवींच्या परतफेडीची  हमी केंद्र सरकारने घेतली आहे असे नाही.

**(ई)** सदर कायदा कार्यान्वित होण्यापूर्वी कंपनीने स्विकारलेल्या ठेवींची रक्कम परतफेड वा त्यावरील व्याजासह परतफेड, मुदतीनंतर जर नुतनीकरण झाले नसेल तर जेव्हा ठेवीदार मागेल त्यावेळेस परत करण्यात येईल आणि जो पर्यंत या ठेवींची परतफेड केली जात नाही  तोपर्यंत या ठेवींना असुरक्षित ठेवी समजण्यात येईल आणि त्यांचे रॅकींग पॅरी पॅसू (Pari Passu) नुसार इतर असुरक्षित लायबिलिटिज्सोबत असेल.

**(फ)** क्रेडीट रेटिंगवर काही प्रतिकुल परिणाम झाल्यास, ठेवीदारांना कोणत्याही प्रकारच्या दंडाशिवाय त्यांच्या ठेवी काढून घेण्याची संधी देण्यात येईल.

**(ग)** परिपत्रक किंवा जाहिरातीच्या स्वरुपातील परिपत्रकांमध्ये दर्शविण्यात आलेल्या हेतुसाठीच केवळ सदर ठेवी वापरण्यात येतील.

**(ह)** सदर कंपनीद्वारे स्विकारण्यात आलेल्या ठेवी (सुरक्षित ठेवीखेरीज इतर आणि त्याची होणारी एकंदर रक्कम दर्शवायाची आहे) असुरक्षित ठेवी समजण्यात येतील आणि त्याचे रॅंकिंग पॅरी पॅसू (Pari Passu) नुसार कंपनीच्या इतर असुरक्षित लायबिलीटिज्सोबत असेल.

सदर परिपत्रक हे कंपनीच्या संचालक मंडळाच्या नावे आणि अधिकारा अंतर्गत जारी करण्यात आलेले आहे. त्यामधील मजकुरात दि. २६ सप्टेंबर २०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे आणि त्याची प्रत कंपनीच्या संचालकांनी बहुमताने सांक्षाकित केली असुन या परिपत्रकाची इंग्रजी प्रत  रजिस्ट्रर ऑफ कंपनीज्च्या महाराष्ट्र, पुणे यांच्याकडे दि. २९ सप्टेंबर २०१५ रोजी दाखल केली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाने
**फोर्स मोटर्स लिमिटेड करिता,**

दिनांक – ३० ऑक्टोबर, २०१५
स्थळ – आकुर्डी, पुणे.

**प्रसन फिरोदिया**
व्यवस्थापकीय संचालक

*सर्व कायदेशीर बाबींकरीता इंग्रजीतील जाहिरातच ग्राह्य धरली जाईल.